# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

**स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका**

Price ₹ 3/-

# संवाद

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-4 | Issue - 8 | फेब्रुवारी - २०१२ | February 2012**


## संपादकीय

**प्रिय सभासद मित्रांनो,**

मराठी माणसाचं साहित्यप्रेम व नाट्यप्रेम प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राला साहित्याची व नाटकाची समृद्ध परंपरा आहे. मराठी माणसाच्या जीवनात साहित्याला व नाटकाला विशेष स्थान आहे. म्हणूनच नाट्यसंमेलन असो किंवा साहित्य संमेलन असो, त्यात मराठी माणसे उत्साहाने व आपुलकीने मोठ्या संख्येने सहभागी होतात. हा एक आनंदसोहळाच असतो. महाराष्ट्राची नाट्यपंढरी असलेल्या सांगली नगरीत नाट्यसंमेलन आणि चंद्रपूर नगरीत अ.भा.मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. नटश्रेष्ठ श्रीकांतजी मोघे नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते तर विख्यात कवी व लेखक प्रा. वसंत आबाजी डहाके ८५ व्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. यापैकी प्रा.डहाके यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे आम्ही वाचकांचे विशेष लक्ष वेधू इच्छितो.

प्रा. डहाके यांचे अध्यक्षीय भाषण प्रदीर्घ असून त्यात त्यांनी अनेक मुद्द्यांचा परामर्ष घेतलेला आहे. पण आमच्या दृष्टीने त्यातील मराठी भाषेचा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आणि चिंतनीय आहे. प्रा. डहाके आपल्या भाषणात म्हणतात की, ''अभ्यासक्रमात मराठीला महत्त्व नसेल, मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत असतील, दहावीनंतर मराठीची गरज नाही असे बिंबवण्यात येत असेल, मानव्य व सामाजिक शास्त्रे शिकण्याखेरीज इतर कोणत्याही विद्यार्थ्याला मराठीची वा मराठी साहित्याची गरज नाही असे आपण मानणार असू तर मराठी भाषेचे आणि साहित्याचे भवितव्य काय असेल अशी आतडे, आच नसलेली चिंता आपण करीत राहू. गाव तिथे पाणवठा असला पाहिजे ही जितकी नैसर्गिक मागणी आहे, तशीच गाव तिथे ग्रंथालय हीदेखील आहे असेच समजले पाहिजे. दहावीपर्यंत शिक्षणात मराठी माध्यमाचा आग्रह आपण धरतो पण अकरावीनंतरही एक विषय मराठी असलाच पाहिजे. त्यासाठी लोकांनी आग्रह धरायला पाहिजे व शासनानेही त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. एकीकडे आपल्या मुलांना साहित्यापासून आणि आपल्या मातृभाषेपासून तोडणे आणि दुसरीकडे मराठी भाषेचे काय होईल अशी चिंता व्यक्त करणे ही विसंगती आहे.'' एवढ्या स्पष्ट आणि परखड शब्दात आजच्या विदारक नि वास्तव स्थितीची जाणीव प्रा. डहाके आपल्याला करून देतात. त्यामुळे आपण सर्वांनीच अंतर्मुख होऊन मराठी भाषेच्या रक्षणार्थ नव्याने प्रतिज्ञाबद्ध होण्याची नितांत आवश्यकता आहे असं आम्हाला तीव्रतेने वाटतं.

कविवर्य कुसुमाग्रजांनी महाराष्ट्रात मायमराठीची कशी दयनीय अवस्था झाली आहे तिचं अत्यंत विदारक शब्दात केलेलं वर्णन सर्वांनाच आठवेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लेखकांना 'लेखण्या मोडा व बंदूका हाती घ्या' असा अध्यक्षीय भाषणातून संदेश दिला असला तरी त्यांनी स्वत: मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी भाषाशुद्धीची चळवळ उभारली होती हे सर्वश्रुत आहे. अन्य अनेक संमेलनाध्यक्षांनीसुद्धा मराठी भाषेचा मुद्दा आपल्या अध्यक्षीय भाषणांतून यापूर्वी हिरीरीने मांडलेला आहे.

आपल्या मुलांना किंवा नातवंडांना फाडफाड इंग्रजी बोलता येतं या गोष्टीचं कौतुक आई वडिलांनी किंवा आजी आजोबांनी न करता त्यांना मातृभाषेत अस्खलितपणे लिहिण्या-बोलण्याचा सराव आहे की नाही याची प्रथम काळजी घ्यावी. त्यासाठी त्यांना मदत करावी. प्रत्येक मराठी वाक्यात इंग्रजी भाषेतील शब्दांची कुबडी घेण्याची वेळ त्यांच्यावर लिहिता बोलताना येऊ नये याची आपणच दक्षता घ्यायला हवी. 'वचनी लेखनीही मराठी गिरा दिसो' ही 'महाराष्ट्रगीता'त मराठी भाषेच्या संदर्भात व्यक्त झालेली इच्छा फलद्रूप होणं आपल्याच हाती आहे. त्यामुळेच आपल्या भाषेचे नि संस्कृतीचेही रक्षण होणार आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने सुचलेले हे विचार आम्ही अंतरीच्या तळमळीने मांडले आहेत. आपणच मराठीचं भवितव्य घडवू शकतो हा विश्वास बाळगून आपलं योगदान द्यावं.


**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले,**

भ्रमणध्वनी ९८६९९४१६९१

## Attention All Members

It has been advised by the Asstt. General Manager (PPG), Mumbai LHO vide their letter No.PPG/PAN/NMB/7936 dated 8th February 2012 that the **Pension-payment will be withheld w.e.f. February 2012 onwards** for those pensioners/family pensioners who have not yet submitted to the Bank/updated, either uploading themselves or through their pension-paying branch in HRMS, the PAN Card details and Life Certificate. However, family pensioners are exempted from maintenance/updation of PAN in HRMS system.

Members should note the above instructions meticulously to avoid non-credit of pension w.e.f. February 2012.

It is quite possible that members have submitted the same, but the same have not been uploaded in HRMS system by the Branch staff. Please, therefore, contact your branch to avoid inconvenience to you and ensure that the PAN details, as also Life Certificate has been uploaded in HRMS by the Branch staff.

- Secretary

## कृपया इकडे लक्ष द्या

बँकेने असोसिएशनला कळविले आहे कीं, अजूनही बऱ्याच पेन्शनर्स / फॅमिली पेन्शनर्सनी लाईफ सर्टिफिकेट आणि/किंवा पॅन कार्डचा तपशील बँकेला दिलेला नाही. तेव्हां बँकेने असा निर्णय घेतला आहे कीं जो पर्यंत लाईफ सर्टिफिकेट/पॅन कार्डचा तपशील बँकेला देत नाहीत तोपर्यंत अशा पेन्शनर्सचे पेन्शन फेब्रुवारी २०१२ पासून पुढे ते देईपर्यंत स्थगित ठेवले जाईल. फक्त फॅमिली पेन्शनर्सना पॅन कार्ड तपशील देण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. मात्र लाईफ सर्टिफिकेट देणे सर्वांना बंधनकारक आहे याची नोंद घ्यावी. कांहींच्या बाबतीत अशीही शक्यता आहे कीं त्यांनी लाईफ सर्टिफिकेट/पॅन कार्ड तपशील ब्रँचमधे जाऊन दिला आहे पण अजूनपर्यंत संबंधित स्टाफने बँकेच्या HRMS site वर त्याची नोंद केलेली नसेल. तरी बँकेत जाऊन संबंधित स्टाफला भेटून वरील गोष्टींची नोंद HRMS site वर केली आहे कीं नाही याची खात्री करून घ्यावी, जेणे करून आपले पेन्शन खात्यावर जमा होणे चालू राहील.

- सेक्रेटरी

### Members - Please Note

1. Those having taxable income are advised to furnish their investment details to their Home Pension-paying Branch immediately, if not already done.
2. Change of Address, if any, to be recorded in the HRMS SITE, if need be with the assistance of the pension-paying branch.
3. Avail the Mobile Banking services offered by our Bank and arrange to get SMS alerts of the transactions in their account.

(Courtesy - Chennai Circle Assn's monthly magazine "Elders' Voice")

## अभिनंदन

**आपले कराड येथील सभासद श्री.वासुदेव यशवंत तथा बाळासाहेब प्रभुणे यांची महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या 'निधी व्यवस्थापन समिती' वर अशासकीय सदस्य म्हणून दोन वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल श्री.प्रभुणे यांचे असोसिएशनतर्फे मन:पूर्वक अभिनंदन ! श्री.बाळासाहेब हे सामाजिक क्षेत्रात बरीच वर्षे कार्यरत असून ते ८० वर्षाचे आहेत. या वयात सुद्धा समाजासाठी कार्यरत राहण्याची त्यांची तळमळ वाखाणण्याजोगी आहे. सध्या ते महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (सातारा जिल्हा ) ग्राहक संरक्षण सेलचे अध्यक्ष, 'तसेच राज्यव्यापी महाराष्ट्र ग्राहक संरक्षण पंचायतीचे ते अध्यक्ष आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा!**

**- सेक्रेटरी**

# State Bank Of India Pensioners' Association Mumbai Circle, (Pune)
## Mumbai Zonal Sub-centre

A/5 Swami Siddharth CHS Ltd.
S.V.Road, Naupada,Thane-400602
Tel No. (022) 25446837
Dt : 14th February 2012

## N O T I C E

The Managing Committee of the Mumbai Zonal Sub-Centre at its meeting held on the 8th January, 2012 has decided to hold the 25th Annual General Meeting of our **Association's Mumbai Zonal Sub-Centre** on Wednesday the 21st March 2012 at 11.30 a.m. at the following address :-

**Shri Shivaji Mandir (Natya Gruha)**
Opp. Plaza Theatre, N. C. Kelkar Path, Dadar (W) Mumbai 400 028

### A G E N D A

1) To condole the death of Bank's Pensioners/Family Pensioners/ Associate Members whose names have been reported to us after the 11th February 2011. Members are requested to advise us the names and dates of death of members, if not in the list, to be read at the time of AGM.
2) To confirm the minutes of the Annual General Meeting held on 11th February, 2011 (Minutes published in May 2011 issue of Samvad)
3) To honour the Senior members who have completed / will complete 75 years age between the 12th February 2011 and 21st March 2012 (both days inclusive).
4) Committee's Report for the year 2011 to be read, discussed and adopted (A copy of the report is enclosed)
5) To discuss the recent developments.
6) Speech of the Chief Guest.
7) Speech of the President.
8) Elections of the Office Bearers / Committee Members of the Mumbai ZSC for the years 2012 & 2013. Nomination forms and other information has been published elsewhere in this issue.
9) Any other business with the permission of the Chair.

By order of the Managing Committee
R.S. Rajiwdekar
Principal Secretary

Encl : Report

**Note:**

At 11.30 a.m. if there is no quorum, then the Meeting will be adjourned for half an hour and the adjourned meeting will be held on the same day and at the same place and the business on the Agenda of the Meeting will be transacted for which no quorum will be necessary.

### Note

i) Please bring a copy of "Samvad" issue for February 2012 along with you for security purpose.
ii) Please inform other members, known to you, about this meeting.
iii) The meeting of the Bank's Pensioners arranged by the Bank on the 21st March 2012 will start at 12.30 p.m. at the same venue. (Due to exigencies the timings may vary.)

**Important :** As per our practice, a memorandum covering all the problems will be submitted to the management well in advance to enable them to study and reply in Bank's Meeting. Pensioners/Family Pensioners are, therefore, requested to inform their problems to us in writing so as to reach us before 10th March 2012, so that a consolidated memorandum will be put up to the Bank Management to eliminate direct questions / discussions with the Management representatives in the Meeting. This is to adhere to the time schedule.

iv) Snacks will be served on the 3rd Floor of the building as usual.

v) All seats in **'A' to ' C' rows** are reserved for special invitees. Members are requested to please occupy the seats in other rows. For the sake of convenience all the Members who are completing 75 years and are to be honoured are requested to occupy the seats in A & B rows.

* * * * * * * * * * * * * * * *

## Biennial Elections of the Office-bearers for the years 2012 &2013

**(for the period from 1-04-2012 to 31-03-2014)**

Elections for the following posts will be held in the Annual General Meeting to be held on the 21st March 2012. The elections will be held by raising of hands in the meeting if more than one member wishes to contest for the same post.

**Elections for the years 2012 & 2014 for Mumbai Zonal Sub-Centre**

| Post | Area |
|---|---|
| 1) President | |
| 2) Vice-President | |
| 3) Principal Secretary | |
| 4) Treasurer | |
| 5) Organising Secretary | |
| 6) Regional Secretary | Malad to Kandivali |
| 7) Regional Secretary (Ladies representative) | |
| 8) Regional Secretary | Borivali to Mira Road |
| 9) Regional Secretary | Bhayandar to Dahanu Road |
| 10) Regional Secretary | Thane Municipal Corp. Area |
| 11) Regional Secretary | Powai & around |
| 12) Regional Secretary | Part of Thane Dist. (Dombivli (Central Railway) & New Mumbai |
| 13) Regional Secretary | Parel to Sion, Mahim |
| 14) Regional Secretary | Raigad District |

(The Nomination Form for the Election is published on the next page)

***S.B. Gokhale***
***President***

## Nomination Form

Form of nomination paper for election to the post of the Members of the Managing Committee of the State Bank of India Pensioners' Association Mumbai Zonal Sub-Centre, Mumbai for the Biennial period from 1st April 2012 to 31st March 2014.

Name of the Candidate with Membership No. : ......................................................................

Address of the Candidate : ......................................................................

: ......................................................................

Post applied for : ......................................................................

Name of the Proposer with Membership No. : ......................................................................

Address of the Proposer : ......................................................................

Name of the Seconder with Membership No. : ......................................................................

Address of the Seconder : ......................................................................

......................................................................

Place :
Date :

Signature of the Seconder

Signature of the Proposer

Declaration by the candidate

I, Shri/Shrimati ………………………………………….. hereby signify my willingness to serve as Member of the Managing Committee for the post applied for of the SBI PA Mumbai ZSC Mumbai ………………………………… ………………… If I am elected to the said post.

Place:
Date :

…………………………………..
Signature of the Candidate

*********************************************

Nomination forms should be sent to Shri C.N. Ketkar, directly before 16th March 2012 on the following address.

Shri C.N. Ketkar
A-6, Samrudhi Society, 90 Ft Road, Sane Guruji Nagar,
Mulund (E), Mumbai 400 081

# Report of the Managing Committee of the Mumbai Zonal Sub-centre for the year - 2011

The last Annual General Meeting of our Circle Association was held at Satara on the 31st July 2011.

**1) Managing Committee Meetings -**

During 2011, four Committee Meetings were held which were well attended. Besides, two meetings of the Circle Managing Committee were held in our office.

**2) Condolences -**

We request to advise the death of the members whose names have been / will be published in various issues of 'Samvad'. However, all the names will be read at the time of AGM. We extend our heartfelt condolences to the bereaved families.

**"May the departed Souls of the Members rest in peace"**

**3) Membership and Finance -**

During 2011, the Zonal Sub-centre enrolled 215 new members as against 283 enrolled in 2010. The break-up of new membership is as under :

| | | |
|---|---|---|
| Patron Members | : | 110 |
| Associate Patron Members | : | 92 |
| Benefactor Members | : | 6 |
| Associate Benefactor Members | : | 6 |
| Family Pensioner Members (Patron) | : | 1 |
| Family Pensioner Members (Benefactor) | : | -Nil |
| Total new Members enrolled during 2011 | : | 215 |

Out of 215 new members, the breakup of old retirees and who retired during 2011 is as under:

| | |
|---|---|
| Old Pensioners/Associates/Family Pensioners | 29 |
| New Pensioners/Associates/Family Pensioners | 186 |
| Total | 215 |

The Office Bearers/the Committee Members who have been instrumental for enrolling 215 new members during the year are as under:-

Sarvashri P.A.Lopes, S.W.Agarkar, S.M.Dharadhar, R.S.Rajiwdekar, P.S.Uchagaonkar, J.B.Pusalkar, M.V.Nadkarni, B.P.Khare and Miss Neela V. Vyavaharkar

We request our Pensioners/Family Pensioners and Associate Members who are yet to become patron members to do so by paying the difference of Patron Membership contribution less already paid by them.

A sum of Rs.6,46,990/- has been collected during the year under report as against Rs.11,44,347 during 2010. The reduction in collection is mainly due to sizeable amount collected in 2010 by us for "Legal Fund" (Rs.7.00 lacs), besides reduction in enrolment of new Members.

The breakup of collection is as under:-

| | | |
|---|---|---|
| Admission Fee, Membership Fee | Rs. | 2,11,650 |
| Donations received for Building Fund | | - NIL - |
| Legal Fund | Rs. | 3,20,177 |
| Misc. Donations | Rs. | 57,063 |
| Samvad Magazine | Rs. | 600 |
| Advt. in Samvad | Rs. | 57,500 |
| Total | Rs. | 6,46,990 |

We are glad to state that several members have given donations for various reasons viz.

i) Excellent work done by the Association;
ii) Daughter's/Son's marriage;
iii) On their 70th and 75th Birthday;
iv) In memory of beloved family members
v) Legal/Bldg. Fund etc.

In this context it is necessary to make a special mention of the following donors.

| Name of Donor | Amount | Name of Donor | Amount |
|---|---|---|---|
| Shri R.B. Kelawala | Rs. 10,001/- | Shri S. Subramanian | Rs. 10,000/- |
| A Well wisher | Rs. 10,000/- | Smt. Snehal P. Desai | Rs. 10,000/- |
| A Well wisher | Rs. 10,000/- | | |

Names of Donors of Rs.5000 but less than Rs.10,000 are as under:

Shri M.V. Prabhu, Smt. Padmaja Mhadgut, Smt. Nayan Panse, Smt. Sheetal Sapre, Smt. Vijaya Karve, Sarvashri A.D. Pandit, Kalidas Kulkarni, B.A. Bhende, G.K. Surati, K.V. Chitre, D.F. Lakdawala, H.M. Randeria, F.R. Fernandes, Vasant Warty, R.G. Kudalkar, V.K. Khadilkar, Deepak Navalkar & D.N. Madan.

**4. Pensioners' Meets -**

Pensioners' Meets were arranged by the following Branches :-

| Branch | Date of Meeting |
|---|---|
| SBI J.P. Road Andheri (W) | 14-01-2011 |
| SBI Versova | 24-02-2011 |
| SBI Andheri (E) | 18-10-2011 |
| SBI Dahisar | 20-10-2011 |
| SBI Dombivali (E) | 24-11-2011 |
| SBI Naupada | 20-12-2011 |

The Bank has also arranged meetings at Chembur, Mulund (E), Versova on Pensioner's Day i.e. on 17th / 18th December 2011. During above Meetings following matters were discussed:-

The present progress about revision of REMBS, Revision in Family Pension at industry level w.e.f. 1-5-2005; payment of FPP/PQA w.e.f. 1.5.2005, present position of cases filed by various Circle Associations/Family Pension Revision @ 30% etc. Modification in REMBS with domiciliary Treatment.

A session of questions & answers was also arranged during the meetings and the doubts expressed by the Members were clarified.

**5. IBI Employees' Provident Fund Forefeiture Account :**

Since the Govt's approval has not been received, the Bank could not issue Circular for payment of residual balance in Forefeiture Account.

**6. Retired Emp. Medical Benefit Scheme :**

As you are aware originally in July 1996 the Scheme was started with an amount of Rs.2 lacs as a result of the efforts made by our Federation and the constant follow up made by Sarvashri B.G. Dandekar and P.S. Santhankrishnan to sell this concept to the Bank. Although the Federation had proposed an amount of Rs.1 lac to start with, the Scheme was approved by the Bank when Shri P.G. Kakodkar was the Chairman. The amount of cover was graciously increased by Shri Kakodkar to Rs.2 lacs. The scheme was applicable to those pensioners who had completed at least 30 years pensionable service at the time of retirement. This scheme was closed on 30th June 2003 and a new scheme for Rs.5 lacs was introduced by the Bank from 1-7-2003 for such retirees who retired at the

age of 60 years (complete). Another Scheme for top Executives (Scale Dy. GM to Dy. M.D.) was started by the Bank w.e.f. 17-1-2008, with additional facility of domiciliary treatment. However this modified Scheme was applicable only to those pensioners who retired after 31-12-2006. Thereafter at the instance of our Federation, this Scheme was extended even to those Pensioners who retired prior to 1-1-2007 (effective from 24-9-2009). The scheme of Rs.5 lacs has since been improved further w.e.f. 24-9-2009 by increasing the ceiling upto Rs.7 lacs and facility of domiciliary treatment of 10% also extended to Members of this scheme. Two more diseases have also been added to the list of 18 diseases to make it 20 diseases. This scheme has been introduced w.e.f. 24-9-2009. We have been told that the review of the entire Scheme may be considered in 2013.

**7. Structured Meeting :**

For the first time a structured meeting of the Circle Association with the Bank Management was held on the 22nd October 2011 and various problems/ difficulties faced by the Pensioners/Family Pensioners in the Circle were discussed and the Management representatives assured us to look into the matters. Holding of this Meeting had provided recognition and a regular forum to the Circle Association to ventilate our grievances before the Circle functionaries.

**8. Federation Front :**

i) The Federation of SBI Pensioners' Associations has, on 16-3-2011 filed the case in Supreme Court, for calculating pension @50% of pay (for 30 years' pensionable service) on last drawn salary, to all the pensioners who retired on or after 1-11-1987. The case was admitted on 13-5-2011. The case has been filed against (a) Government of India (b) RBI (c) SBI (d) Trustees of the Pension Fund. Bank has since filed their reply and Federation has also filed counter Reply to Bank's reply. Government of India is yet to file the reply. Next hearing is on 12-3-2012. (Information about the above case is published in "Samvad", from time to time).

ii) Federation has also initiated/impleded in the cases filed at Nagpur/ Bangalore/Hyderabad. Hyderabad case was decided in our favour in 2003. However GOI/Bank has gone into appeal before the Bench of the High Court. No progress in other two cases.

iii) You are aware that a case has been filed by seven Pensioners in the High Court of Delhi against GOI/RBI/SBI. The case is being adjourned every week and not yet come up for hearing.

iv) More than 200 Pensioners filed few cases in respect of 7th Bipartite Retirees in Chennai High Court. On 16-10-2008 the case was decided in favour of those retirees who filed the case. However, GOI has gone into appeal before the bench of the High Court. The case has not comeup on the board.

v) Kerala High Court enhanced gratuity case for Rs.10 lakhs has been filed by some of the pensioners, however, there is no progress in the case.

We thank Executives from Corporate Centre, Staff of PPG Dept. at Corporate Centre for their co-operation in solving our problems. We thank Mrs. Arundhati Bhattacharya - Dy. MD & CDO (P&HR), Shri Ashok Garg - Chief General Manager (HRD), Shri Deepankar Bose - DGM PPG, Shri Sureshchandra - DGM (IR), Shri Deepak Chopda - AGM (Personnel), Mrs. Pooja Thakur - AGM PPG, Shri A K Nandi - AGM and Shri Chintamani Muley, Dy. Manager, PPG, and all other staff of PPG Department, Corporate Centre, Mumbai.

We also thank Dr. Mrs. V.M. Ajinkya - Chief Medical Officer, and Administrative Officer, & Staff of Medical Department, Corporate Centre for the valuable advices/support given by them from time to time.

Further, we thank Mumbai Circle authorities, specially Shri A. Sen CGM (Mumbai Circle) (since transferred on promotion as Dy. M.D.). We welcome new CGM Dr. D.K. Mishra,

We also thank Shri O.P. Poonia - DGM & CDO, Smt. Varsha Mondkar - AGM Personnel & HRD, Officer and Staff at Staff Welfare Cell, and Sarvashri Patwardhan - PRO, K.D.Thaokar - AGM (PPG), Pradeep Thakre, CM (PPG), entire staff of the PPG Department, Smt. (Dr.) Manjusha Padhye - Sr. Medical Officer.

We thank the Mumbai Administrative Office functionaries. We welcome Shri V. Jayaraman on and Shri Murthy both DGM Zonal Office, Sarvashri K.G. Bhavse - AGM, Manohar Kamat - Chief Manager (HR - I), Ravindra Maldikar - Chief Manager (HR - II), Reymond D'Souza - Deputy Manager, Staff Welfare Cell, & Dr. Ramesh Nair, Sr. Medical Officer and Staff of HR Department.

For and on behalf of Managing Committee
R.S. Rajiwdekar
Principal Secretary

****************************************************************************

## युनिट वार्ता

### कोल्हापूर युनिट :

कोल्हापूर युनिट वर्षभर काही ना काही निमित्ताने सर्व सभासदांनी एकत्र यावे म्हणून वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करीत असते. शनिवार दि.२४ डिसेंबर २०११ रोजी दुपारी ४ वाजता 'पेन्शनर्स डे' व 'कोजागिरी' निमित्त खरे मंगल कार्यालयात जमले होते. वास्तविक पाहता 'पेन्शनर्स डे' हा १७ डिसेंबरला व कोजागिरी या आधीच होऊन गेली होती. पण सभासदांच्या अमाप उत्साहामुळे आणि सर्वांच्या सोयीसाठी २४ डिसेंबरला सर्वजण एकत्रित आले होते. एकूण ७५ स्त्री-पुरूष सदस्यांची उपस्थिती होती आणि सगळे वातावरण जुन्या आठवणी व गप्पांनी भारून गेले होते. कार्यक्रमाची सुरूवात श्री.जयंत रुकडीकर यांनी केलेल्या सर्वांच्या स्वागताने झाली. दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहिल्यावर श्री.रुकडीकर यांनी युनीटच्या कामाचा आढावा घेतला व नियोजित मालवण-तारकार्ली सहलीबाबत सविस्तर सांगितले. त्यानंतर सौ.बेकीनकर व सौ.पंढरपुरे यांनी प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम सादर केला व कार्यक्रमात बहार आणली.

त्यानंतर मुख्य आकर्षण असलेला श्री.श्रीनिवास कोडोलीकर यांचा 'कोल्हापूरी रस्सा' हा कोल्हापूरी माणसांची वैशिष्ठ्ये सांगणारा विनोदी कार्यक्रम सादर झाला. त्याला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. श्री.प्रभूइंगळीकर यांनी सुरूवातीला श्री.कोडोलीकर यांचा परिचय करून दिला तर श्री.आर.जी.कुलकर्णी यांच्या हस्ते कोडोलीकर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. शेवटी श्री.रुकडीकर यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर अल्पोपहार व दुग्धपान होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. हा कर्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री करंबेळकर, इंगळीकर, दिवाण, पत्की. पोंक्षे, आर.जी.कुलकर्णी, आर.आर.कुलकर्णी, मुधाळे तसेच सौ.बेकीनकर व सौ.पंढरपुरे या सर्वांनी परिश्रम घेतले.

दि.१८ जाने.२०१२ रोजी दुपारी ४ वाजता युनिटचा संक्रांतीनिमित्त तिळगूळ समारंभ व महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभ येथील हुतात्मा पार्क येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात ७३ स्त्री-पुरूष सभासदांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला. सौ.सलंत्री यांनी गीत गायन केले. तर सौ.बेकीनकर व सौ.पंढरपुरे यांनी 'बाप' या विषयावरील स्फुट वाचले. श्री.जी.एन.जोशी यांनी विनोदी उखाणे व किस्से सांगून कार्यक्रमात रंगत आणली. नंतर तिळगूळ वाटप व चहापान झाल्यावर कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.बेकीनकर, सौ.पंढरपुरे व स्थानिक पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

– जगदिश दिवाण, अध्यक्ष

*********

### सातारा युनीट :

३१ जुलै २०११ रोजी आपल्या असोसिएशनचे वार्षिक अधिवेशन या वर्षी सातारा येथे संपन्न झाले. ह्या अधिवेशनाचे आयोजन अर्थातच सातारा येथील आपल्या सभासदांनी पुणे येथील कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुनियोजित पद्धतीने केले होते. आपल्या प्रथेप्रमाणे अशा सर्व स्थानिक कार्यकर्त्यांसाठी एक 'श्रमभोजनाचा' कार्यक्रम दि.१६ जानेवारी २०१२ रोजी साताऱ्याचे कास पठारावरील डॉ.सुयोग दांडेकर यांनी चालवलेल्या 'प्रकृती आयुर्वेदिक हेल्थ रिसॉर्ट' या रमणीय ठिकाणी संपन्न झाला. या कार्यक्रमास आपल्या असोसिएशनचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले तसेच पुणे-मुंबई येथील कांही कार्यकारिणी सदस्यही उपस्थित होते. यावेळी डॉ.सुयोग दांडेकर यांनी 'आयुर्वेद व आपले जीवन' या विषयावर अत्यंत रोचक पद्धतीने सर्व सभासदांशी संवाद साधला. या कार्यक्रमाचे निमित्ताने मा.व्ही.एम.गोखलेसाहेब हे येत्या ३ फेब्रुवारी २०१२ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत म्हणून त्यांचा सत्कार डॉ.सुयोग दांडेकर यांचे हस्ते शाल, श्रीफळ व सातरी कंदी पेढे देऊन करण्यात आला. आपल्या अध्यक्षांचा पंचाहत्तरीनिमित्तचा सत्कार करण्याचा हा आनंद सोहोळा सर्कलमध्ये सर्व प्रथम सातारा येथे साजरा करता आला याचा सातारा युनिटला आनंद व अभिमान वाटतो.

– एस.एस.देशपांडे, अध्यक्ष

**अहमदनगर युनिट :**

१३ जानेवारी २०१२ रोजी बोचरी थंडी व कोवळे ऊन अंगावर झेलत अहमदनगर युनिटची वार्षिक सभा ६० सदस्यांच्या उपस्थितीत शहरापासून दूर असलेल्या एका शेतावर संपन्न झाली. या सभेत अर्थातच हुर्डा पार्टी - पिठलं भाकरी, ठेचा व गरमागरम कोवळा हुर्डा - असल्याने खूप मजा आली. याच सभेत पुढील २ वर्षांसाठी युनिटच्या नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड झाली. त्यात श्री.दिलीप कुलकर्णी - अध्यक्ष (मो.नं.९४२३७९२९६०); श्री.शिवप्रसाद जोशी - सेक्रेटरी (मो.नं.९३७२०६३९९९); व श्री.जयंत जोशी - ट्रेझरर (फोन - ०२४१/२४२६२१८) यांचा समावेश आहे. नविन कार्यकारिणी दि.१ एप्रिल २०१२ पासून कार्यभार स्विकारेल.

- शिवप्रसाद जोशी, सेक्रेटरी

**D.A.Circular for the period from February 2012 to July 2012**

Till finalization of Matter for 'SAMVAD' for February 2012 upto 17th February '12, the DA Circular for Pensioners/Family Pensioners was not issued by the Bank, hence could not be included in this issue. However, as soon as it is issued and a copy thereof is received, it will be uploaded on our web-site - '**www.sbipensionerspune.org**' for information of the members which please be noted. The revised DA will be paid by the Bank while crediting pension for February 2012.

***- Secretary***

## अभिनंदनीय

आपले नाशिक येथील सभासद श्री. भरत जैन हे विविध वृत्तपत्रातून विविध विषयांवर लेखन व पत्रव्यवहार करीत असतात.

त्यासाठी त्यांना तिसऱ्यांदा 'नाशिक जिल्हा' मराठी पत्रकार संघ नाशिक तर्फे उत्कृष्ट पत्र लेखक म्हणून जानेवारी २०१२ या पुरस्कार प्राप्त झाला आहे.

श्री. भरत जैन यांचे हार्दिक अभिनंदन व त्यांच्या या कार्यास असोसिएशनच्या शुभेच्छा !

**- सेक्रेटरी**

## नेत्रदान - आवाहन

नमस्कार,

मी, अनिल खाडिलकर, आपल्या बँकेतून ३१ जुलै २००२ रोजी निवृत्त झालो. सामाजिक कामाची आवड असल्याने तसेच प्रापंचिक जबाबदाऱ्यांमधून मोकळा झाल्यामुळे आठ वर्षांपूर्वी मी नेत्रदान, देहदान व रक्तदान ह्याची सामाजिक गरज लक्षात घेऊन त्यासंबंधीच्या जागृतीचे काम सुरू केले. मला हे सांगण्यास अतिशय आनंद वाटतो कीं लोकांचा तसेच आपल्या सभासदांचा फारच चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गेल्या वर्षी मी आपल्या 'संवाद' मधून एक सविस्तर लेख लिहून याविषयी आवाहन केले होते. तसेच नोव्हेंबर २०११ च्या अंकात पान नं.९ वर संपर्कासाठी माझे फोन नंबर दिले होते. त्यानंतर मला त्याविषयी माहिती विचारण्यासाठी व फॉमर्स् साठी ठिकठिकाणाहून असंख्य फोन आले. महाराष्ट्रात अनेक गावी नेत्रपेढ्या व रक्तपेढ्या आहेत व त्या प्रत्येक पेढीचे वेगवेगळी माहिती भरून घेणारे वेगळे फार्मस् असतात व इच्छुकांनी ते फार्म भरून देणे अपेक्षित असते. म्हणजे या स्थानिक पेढ्यांना 'योग्य' वेळी त्या त्या इच्छुकांना/ त्यांच्या नातेवाईकांना संपर्क साधणे शक्य होते. त्यामुळे आपल्या असोसिएशनच्या पुण्याबाहेरील युनीटमधील उत्साही कार्यकर्त्यांनी स्थानिक नेत्रदान, देहदान व रक्त संकलन याविषयी काम करणाऱ्या संस्था तसेच हॉस्पिटलस् यांचे पत्ते व फोन नंबर व इतर माहिती मिळवून ती आपल्या सभासदांसाठी व इतरांसाठीही उपलब्ध करून द्यावी, जेणे करून 'योग्य' वेळी त्याचा उपयोग होईल व सामाजिक कार्य केल्याचे समाधान मिळेल. या कामात आपल्या युनिटस्च्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन या कार्याचा स्थानिक सभांमधून याचा प्रसार करावा ही नम्र विनंती. पुण्यातील सभासदांनी माझेशी संपर्क साधावा.

आपले माजी अध्यक्ष श्री.बी.जी.दांडेकर साहेब यांचे प्रत्येक सभेत केलेले आवाहन आपण सदैव लक्षात ठेवावे -'यामुळे एका गरजू व्यक्तीला 'दृष्टिसुख' वा 'जीवनदान' मिळणार आहे.'

**- अनिल खाडीलकर**

**संपर्कासाठी पत्ता :**
अनिल खाडिलकर, 'धनश्री', २४, स्टेट बँक कलारंग सोसायटी, पटवर्धन बाग, एरंडवणे, पुणे-४११००४; (मो) ०९८५०९८४०४५; (फोन) ०२०-२५४४०८५१

**दु:खद निधन**

आमच्या मातोश्री श्रीमती गणपतीबाई बबेरवाल यांचे दि. ३ डिसेंबर २०११ रोजी त्या पूजा करीत असतांनाच दु:खद निधन झाले. त्यांचे वय १०९ वर्षे होते. त्या अतिशय प्रेमळ, श्रद्धाळू व वाणीत सिद्धि असल्याबद्दल सर्वांना सुपरिचित होत्या. ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्गती देवो हीच प्रार्थना. - मदनलाल बबेरवाल

(Advt)

# SBI PENSIONERS' ASSOCIATION (MUMBAI CIRCLE) PUNE
# PANAJI (GOA) ZONAL SUB-CENTRE

## NOTICE OF THE ANNUAL GENERAL MEETING

14th ANNUAL GENERAL MEETING OF OUR PANAJI (GOA) ZONAL SUB CENTRE will be held on Sunday the 15th April 2012 at 9.30 am at State Bank of India Complex, Patto Plaza, behind Kadamba bus terminal, new building of Staff Learning Centre, Panaji (Goa) to transact the following business:

## AGENDA

1) To condole the death of Bank's pensioners/family pensioners and associate members whose names were reported after the last AGM.
2) To confirm the minutes of the last AGM.
3) Managing Committee report for the year 2011 to be read, discussed and adopted.
4) To honour the senior members who have completed/will be completing 75 years of age during the period 27-03-2011 to 15-04-2012
5) Speech of the Chief Guest.
6) Speech of the President of Panaji (Goa) Zonal Sub Centre.
7) Speeches of the special invitees and office bearers of our Circle Association .
8) Elections of the Office bearers and Committee members of the Panaji (Goa) zonal sub centre for the period 2012-2014. Association Members desirous to stand for election as Office bearers and Committee members to work for the Association are requested to submit their **nominations in writing before 15 days of the date of the Annual General Meeting to the Secretary, Panaji ZSC, at the following address:**

   Mr.I.H.Dias, Secretary, State Bank of India Pensioners' Asssociation, Flat 3, "Apple Blossom", Miramar State Bank of India Empl. Co-op Housing Society Ltd., La Campala, Panaji, GOA - 403001.
9) Any other matter with the permission of the chair.

All the members from Goa, Ratnagiri and Sindhudurg districts are requested to attend the meeting.

The Bank's Pensioners Meet arranged by the Bank on the same day will start soon after 10.00 a.m. at the same venue (due to exigencies, timings may vary). All members in the area of operation of Panaji module are requested to attend the meeting. Please inform other members known to you regarding the AGM meet and the Pensioners' Meet.

Snacks/Tea in the morning and Lunch will be served during the AGM. Please note that no separate notice of this Annual General Meeting will be sent to the members.

***I.H.Dias***
***Secretary***

( We reproduce a letter addressed to our Bank by our Federation in respect of submission of PAN Card details in HRMS for information of members)

# FEDERATION OF STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATIONS

**State Bank Building, 84 Rajaji Salai, Chennai - 600001**

To, Dt.:21-01-2012

The Dy. Managing Director & CDO
State Bank of India,
Corporate Centre,
Mumbai - 400021

Madam,

Sub : Withholding of Pension for not uploading PAN Number to HRMS site from January 2012 onwards

We refer to the appeal made to the Chief General Manager (HR) by the undersigned over the phone today to defer implementing your decision on stopping payment of pension from January 2012 onwards to those pensioners, who have not updated their PAN Card Number to the HRMS site, for the following reasons.

i) The pensioners, particularly those from the cadres of sub-ordinate staff and part-time employees, whose income will not exceed the taxable limit under any circumstances, feel that there will not be any obligation on the part of the Bank to deduct and remit TDS from the pension paid/payable to them. Hence they consider that there is no need for the Bank to compel them to obtain PAN Cards and furnish their PAN number to the HRMS site. In such cases, we are not in a position to convince them with any rationale compelling the Bank to withhold their pension from January 2012 onwards.

ii) Most of the pensioners need support from the Branch Officials for up-loading their PAN number details to the HRMS site. A large number of pensioners have represented to us their difficulties experienced in getting the necessary assistance from the Branch Officials for the reason that no circular instructions have been received by the officials. The instructions reported to have conveyed by LHO PPG Departments through the respective controllers have not perlocated to a large number of Branch officials. It would help the pensioners to comply with this requirement, if the Branch Officials get more involved in bringing these instructions to notice of the pensioners served by them.

iii) Most of the pensioners living in the up-country centres of our Country are not aware of this requirement, as no communication from our Bank stipulating this requirement of PAN Number for payment of their monthly pension was sent to them nor they were made aware of this requirement through any notice/ publication. Most of them may feel that there could be no justification for the Bank to withhold payment of their monthly pension necessary for their sustenance for enabling the Bank to meet the requirements of the I.T.Department not applicable to them.

iv) The requirement that PAN Numbers uploaded to the HRMS site should tally with the details recorded in NSDL web site is not known, not only to a large number of pensioners but even to a large number of Branch Officials. This excercise of comparing with NSDL site is required to be carried out with the help of Branch Officials in case of any discrepancy, the necessary corrections can be made only after advising the pensioners concerned of such discrepancy. Some more time would be required for making the necessary corrections.

2. In the circumstances explained herein above, we request you to arrange to grant more time to the pensioners for complying with this requirement and defer implementing your decision on withholding payment of pension from January 2012 onwards. We have been taking all possible steps from our side for enabling the pensioners to meet this requirement of the Bank. We assure you of our continued commitment in educating all the pensioners for complying with this requirement.

Thank you,

Yours sincerely,
Sd/-
General Secretary
(P.P.Sankaranarayana Murthy)

पांचवा स्मृतिदिन (१-२-२०१२)



**स्वर्गीय सॅमसन सॅम्युअल तळकर**
(कर्तबगार हेड कॅशियर)

*दयेचा सागर, वात्सल्याचे आगर ।*
*बहुजनांचे फुलविले संसार ।।*
*स्मृतिगंध दरवळो निरंतर ।*
*प्रेमी मंडळींना न व्हावा विसर ।।*

*****

**।। स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन ।।**

*- सॅमसनसाहेब प्रेमी मंडळ, पुणे*

**For information of members from Panaji (Goa) Module**

## Staff Welfare Activities

### Empanelment of Hospital for Post-Treatment Payment facility

It has been advised by Panaji (Goa) Zonal office vide its letter No.DGM/CMHR/933/0774 dated 18th January 2012 that Bank has entered into tie-up arrangement on 13-01-2012 with **Apollo Victor Hospital, Margao** for extending Post Treatment payment facility to Supervising/Award staff, their dependent family members and **also for retired staff members under SBIREMB Scheme.**

2. The members may avail the facility on production of the referral letter from the Bank's Medical Officer.

This is for information of our members.

*I.H.Dias*
Secretary, Panaji ZSC

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स सहली

**राजगुरु टुर्स**
जिव्हाळा जपणारी माणसं...

| | Package Min 4 Pax | Conducted |
|---|---|---|
| काश्मिर-वैष्णोदेवी | ₹ 11,975/- | ₹ 17,975/- |
| सिमला-मनाली-चंदीगड (AC) | ₹ 12,475/- | ₹ 18,475/- |
| नैनीताल-कॉर्बेट-मसुरी (AC) | ₹ 11,475/- | ₹ 19,975/- |
| दार्जिलीग-सिक्किम-गंगटोक | ₹ 10,975/- | ₹ 16,975/- |
| केरळ बॅकवॉटर्स (AC) | ₹ 9,975/- | ₹ 15,475/- |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | ₹ 8,975/- | ₹ 12,475/- |
| राजस्थान - मेवाड | ₹ 9,975/- | ₹ 13,975/- |
| लेह - लडाख | ₹ 19,975/- | ₹ 34,975/- |
| भूतान | ₹ 15,475/- | ₹ 19,975/- |

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना विशेष सवलत
मुंबई : 022 - 24318082 / 24381026
संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216
www.rajgurutours.com



*e-Circular*
P&HRD.
Sl.No.:878/2011-12
Circular No.:CDO/P&HRD-PM/90/2011-12
Thursday,January 05,2012.
15 Pausha 1933(S).

All branches and offices of
State Bank of India

Madam/Sir,

**REVISION IN FAMILY PENSION IN RESPECT OF ELIGIBLE MEMBERS OF THE FUND WHO RETIRED/RETIRE ON OR AFTER 1.11.2007**

We refer to our Circular No. CDO/P&HRD-PM/62/2007-08 dated 28.1.2008.

2. In this connection, the Central Board of the Bank in its meeting dated 24.12.2011 have accorded approval for revision in family pension in respect of eligible members of the Fund, who retired/retire on or after 1.11.2007, as under:

**(i) Amount of monthly family pension**
(other than part-time employees):

| Scale of pay per month | Amount of monthly family pension |
|---|---|
| Upto Rs. 7,090 | 30 per cent of the 'pay' shall be the basic family pension plus 30 per cent of allowances which are counted for making contributions to Provident Fund but not for dearness allowance shall be the additional family pension. The aggregate of basic and additional family pension shall not be less than **Rs. 1,779 per month**. |
| Rs. 7,091 to Rs. 14,180 | 20 per cent of the 'pay' shall be the basic family pension plus 20 per cent of allowances which are counted for making contributions to Provident Fund but not for dearness allowance shall be the additional family pension. The aggregate of basic and additional family pension shall not be less than **Rs. 2,186 per month**. |
| Above Rs. 14,181 | 15 per cent of the 'pay' shall be the basic family pension plus 15 per cent of allowances which are counted for making contributions to Provident Fund but not for the dearness allowance shall be the additional family pension. The aggregate of basic and additional family pension **shall not be less than Rs. 2,841 per month and more than Rs. 5,930 per month**. |

Note:- In the case of part-time employees, the minimum amount of family pension and the maximum amount of family pension shall be in proportion to the rate of scale wages drawn by the employee.

**(ii) Minimum pension :-**
In respect of employees other than part-time employees, who retired on or after 1.11.07, the amount of minimum pension shall be Rs. 1,779 p.m. In respect of part-time employees who retired on or after 1.11.07, the minimum pension payable shall be Rs. 595 p.m. in respect of part-time employees drawing 1/3 scale wages, Rs. 892 p.m. in respect of part-time employees drawing ½ scale wages and Rs. 1,339 p.m. in respect of part-time employees drawing ¾ scale wages.

(iii) A letter of undertaking is to be taken from the pensioner/member(s) of the family pension as per the annexure enclosed to enable the Pension Fund to make adjustments, if any, at a later date.

3. All concerned are advised accordingly. The above instructions should be strictly adhered to. Other instructions in this regard shall remain the same.

Yours faithfully,

**For Dy. Managing Director &**
**Corporate Development Officer**

Enc. Annexure

**************************************************************************************

**Annexure**

To,

The Branch Manager/Manager
State Bank of India,

_________________

_________________

Madam/Dear Sir,

**Revision in Pension in respect of those employees of SBI who retired/retire on or after 1.11.2007**

I am presently drawing Pension/Family Pension through your _____________ Branch/Office in ___________________________Circle and my pension reference No. is ___________________.

I am eligible to get increase in monthly pension/family pension being paid to me on account of the recent revision of pension in respect of those employees who retired/retire on or after 1.11.2007, w.e.f. 1.11.2007. I request you to pay me such revised pension at your earliest. I understand that you are agreeable to release such revised pension, pending amendments in SBI Employees' Pension Fund Rules.

In this connection, I hereby irrevocably authorize you to make any recoveries/adjustments out of my future pension, if it is revealed at any time that I have been paid such increased pension wrongly or inadvertently. I undertake to repay the amount immediately on demand, in lumpsum. In the event, I do not repay the said amount when demanded, the Bank will be entitled to recover the said amount by debit to my/our account/pension account. This undertaking/authority is irrevocable and binding upon me/my legal heirs/nominees as well.

I am also aware that revised pension being paid to me shall be effective from 1.11.07 and that no arrears prior to said date are payable to me.

Yours faithfully,

_____________________________
(Name of the pensioner/member(s))

Place :
Date :

(Courtesy - Chennai Circle Assn's monthly magazine "Elders' Voice")

# List of Pathological / Diagnostic tests provided by our Bank

LIST OF PATHOLOGICAL / DIAGNOSTIC TESTS COVERED AT

---

| LHO / Admin Office Centres (29 TESTS) | | Other Centres (12 TESTS only) With Staff 100 & above |
|---|---|---|
| **Sr.No.** | **Name of the Test** | **Sr.No.** (N/A.- Not Available) |
| 01 | Blood CBC | 01 |
| 02 | ESR | 02 |
| 03 | Urine Routine | 03 |
| 04 | Stool Routine | 04 |
| 05 | Blood and Urine-Sugar, Fasting & Post Prondial | 05 |
| 06 | Serum Cholesterol | 06 |
| 07 | Blood Urea | 07 |
| 07a | NPN | N/A. |
| 08 | Serum Creatnine | 08 |
| 09 | Serum Alkaline Phos | N/A. |
| 10 | S.G.O.T. | N/A. |
| 11 | S.G.P.T. | 09 |
| 12 | Serum Bilirubin | 10 |
| 13 | Blood film for Malarial Parasites | 11 |
| 14 | Sputum for A.F.B. | N/A |
| 15 | Blood Grouping | N/A |
| 16 | Tuberculine test for T.B. | N/A |
| 17 | Bleeding time and clotting time of blood | N/A |
| 18 | Routine culture for Blood/Urine/Stool/ Throat Swab/Pus and Antibiotic Sensitivity Test | N/A |
| 19 | All types of digital X-rays including dental | 12 |
| 20 | ECG | N/A |
| 21 | Ultra Sound - Whole Abdomen & Pelvis Male & Female | N/A |
| 22 | Prothrombin Time Test | N/A |
| 23 | Widal Test | N/A |
| 24 | Uric Acid Test | N/A |
| 25 | G-6-P-D | N/A |
| 26 | Lipid Profile | N/A |
| 27 | T3, T4 & TSH | N/A |
| 28 | Glycosaluted (HbA1C) | N/A |
| 29 | Urine for BS & BP | N/A |

ललित

# घंटानाद

कधी नव्हे इतकी मी आज निवांत झोपणार होते... बरेच दिवसांनी असा निवांत-एकांत मिळाला होता. यजमान काही कामानिमित्त मुंबई बाहेर गेले होते. रात्री मनसोक्त टी.व्ही. बघून, वाचन करून मी १२-१२.३० ला 'निवांत' झोपले. सकाळी कधीच लवकर उठण्याची घाई नव्हती. कारण आता निवृत्तीनंतर तसा एकूण आयुष्याला निवांतपणा आला होता. यजमान घरी असताना.

सकाळी ६ वाजता येणारा दूधवाला.. कधी येऊन गेला हे मला कळत नसे. दूध घेण्याचे काम यजमानच करीत. त्यामुळे तर... मी रात्री अशी निश्चिंत निवांत झोपले. सकाळी उठून चहा नाश्त्याची घाई गडबड नव्हतीच.

''क्या बाईजी कितनी देरसे 'घंटी' बजा रहा हूँ..'' मी दचकून उठून धडपडत दूधासाठी पातेलं घेऊन झोपेत दाराच्या कड्या काढत कसंबसं दार उघडलं. मला दूधवाल्याने कितनी देरसे 'घंटी' बजा रहा हूँ तर हसूच आले, ..... कारण मला तर क्षणभरापूर्वी 'घंटी' ऐकू आली होती.... तर असे हे 'घंटा' प्रकरण झाल्यानंतर.. खरं तर झोप उडालीच होती. म्हटलं चला आज उठलोच आहोत तर पहाटे (माझ्या मते ६-६.३० ही 'पहाटच' होती.) एक फेरी मारून यावी. पटकन तयार होऊन मी माझ्या 'प्रभात फेरी'च्या मोहिमेवर निघाले... भय्याचे 'कितनी देरसे 'घंटी' बजा रहा हूँ ' हे वाक्य आठवून हसू येत होते कि आपण खरंच का त्याला इतका वेळ उभे करून ठेवले होते....

तेवढ्यात देवळाच्या बाजूला उभ्या असलेल्या गायीच्या गळ्यातली मंजूळ घंटा वाजली... त्या गोड आवाजाने सकाळची 'घंटी' डोक्यातून जरा बाजूला गेली.... देवळावरून जरा पुढे जाऊन चक्कर मारून परत येताना अचानक देवळातल्या 'प्रभात' आरतीचा 'घंटानाद' ऐकू आला. सकाळचं एवढं प्रसन्न वातावरण एरव्ही आपण का अनुभवत नाही? असं स्वत:लाच विचारावसं वाटलं. इतके दिवस नोकरीच्या चक्रात अडकल्याने कधीच असं 'सकाळचं फिरायला जाणं' जमलं नव्हतं आणि आता निवृत्तीनंतर ती 'पहाटेची चापण्याची, डब्यांची धांदल नसल्याने, जरा 'आरामातच' आयुष्य उपभोगणं सुरू होतं.... आणि अचानक 'ठण ठण ठण ठण ठण' करीत एक दोन तीन आगीचे बंब जवळून गेले. ''अरे बापरे!'' हाही घंटानादच की!! पण किती दचकवणारा.... मी रस्त्यातच स्तब्ध होऊन त्या जाणाऱ्या बंबाकडे काही क्षण बघत राहिले... कुठे लागली असेल आग काय झाले असेल तिथे? असे अनेक प्रश्नांचे मोहोळ मनात वागवत घराकडे परतत होते. वाटेतच बस थांब्यावर शाळेत जाणाऱ्या मुलांचा घोळका बसची आतुरतेने वाट पहात होता. तेवढ्यात त्यातला एक मुलगा म्हणाला 'कधी येणार बस.. परीक्षा पेपरची वेळ जवळ येत चालली. 'घंटा' झाली तर परीक्षेला बसायला मिळायचे नाही.. तेवढ्यात बस आली आणि मुलांचा घोळका रेटारेटी करत बसमध्ये चढलाही!! कंडक्टरची घंटा वाजली बस सुटलीही. पण माझ्या मनात परत परीक्षेची 'घंटा'... हा शब्द घोटाळत राहिला. हो ही पण एक घंटाच... पेपर सुरू होण्यापूर्वीची घंटा.... आणि लवकर वाजूच नये असे वाटायला लावणारी 'वेळ संपली' दाखवणारी... पेपर संपल्याची घंटा....

अशा अनेक घंटांच्या साखळीत मी माझ्याच विचारात आमच्या बिल्डिंगपाशी येऊन कधी पोचले ते कळलेच नाही... आणि अचानक हातातल्या मोबाईलची 'घंटा' वाजू लागली. 'हे' बोलत होते.. 'अग, आहेस कुठे तू? घरात फोनची घंटा कधीची वाजतेय तू उचलला नाहीस... म्हटलं एवढ्या पहाटे कुठे गेलीस. नशीब मोबाईल तरी घेऊन गेलीस... आणि त्याची घंटा तुला तुझ्या पर्समधून ऐकू आली! हेच विशेष! असो. अग मी पोचतोच आहे घरी, अर्ध्या तासानं तेच सांगायला फोन केला.' मी म्हटलं, 'अहो मी आलेच आहे घराजवळ... जरा 'प्रभातफेरी' करून आले!'

सेल फोन बंद केला आणि डोक्यात पुढल्या विचारांच्या घंटा वाजायला सुरुवात झाली. आज काय काय करायचं, किती वाजता करायचं, कुठं कुठं जायचं... यंव आणि त्यंव....

वेळेच्या मर्यादा दाखवणारा घंटानाद सुरू झाला.

खरोखरच मानवी आयुष्यामध्ये हा घंटानाद किती महत्त्वाचा आहे नाही का! प्रत्येक गोष्टीची जाणीव निरनिराळ्या घंटानादाने करून देणारी ही देवकृपा आहे. काही घंटानाद ऐकू येतात, काही मानवाच्या डोक्यात, मनात वाजतात. हे सर्व घंटानाद 'इशारे' आहेत. मानवाला वेळेचं, काळाचं भान ठेवायला लावणारे. हे इशारेरुपी घंटानाद काटेकोरपणे पाळायलाच पाहिजेत. यामुळेच मानवी जीवनक्रम सुविहीत शिस्तबद्ध राहिल.

- **कार्तिकी वि. काळे,** बोरीवली पश्चिम

दूरध्वनी - २८६१४२३२

## प्रतिक्रिया

आपद्वारा नियमित रूप से भेजा जानेवाला जन्मदिन बधाई संदेश का धन्यवाद।

आपके 'संवाद' में ज्ञानवर्धक जानकारियाँ होती है, उसको पढ़कर आनन्द आता है।

आपकी पूरी टीम इसके लिये बधाई की पात्र है।

यदि संभव हो तो आधे पेज की हिन्दी की सामग्री का भी 'संवाद' में समावेश करने का विचार करे।

आपका ही

व्ही. के. मेहरोत्रा, ठाणे

# नो युवर कस्टमर

एक दिवस सकाळी मला बँकेचे एक रजिस्टर पत्र आले आणि भयंकर आश्चर्य वाटले. सध्या साधा cos72 ॲडव्हाईस पण येत नाही तेथे एकदम रजिस्टर पत्र पाहिल्यावर मला थोडासा घाम फुटला. तसा अधून मधून घाम येतोच पण डॉक्टर म्हणाले, ''तुम्ही सेवानिवृत्त झाल्यावर डोक्याला कानटोपी, हातात हातमोजे, पायात मोजे आणि गळ्याभोवती मफलर गुंडाळून स्वयंपाक घरात कुढत मनाने बसता ना? त्यामुळे हा त्रास जाणवतो. जरा घराबाहेर पडा, हात पाय हलवा, चार चौघात मिसळा, गप्पा टप्पात सहभागी व्हा-सर्व तक्रारी दूर होतील. बँकेचे पाकीट फोडले तर KYC म्हणजे Know your customer गोष्टींची मी पूर्तता न केल्यामुळे खात्यावरचे व्यवहार बंद करण्यात येतील असा इशारा दिला होता. दुसरे दिवशी सकाळी मी माझे रेशनकार्ड, एटीएम कार्ड, पॅनकार्ड, इले. बील, घरपट्टी भरलेले बील, आधार कार्ड, चेक बुक-पास बुक, पास पोर्ट साईज फोटो, शाळेचा दाखला, विवाह नोंदणीचा दाखला आणि हयातीचा दाखला घेऊन बँकेकडे निघालो. त्या वेळेस एका अनोळखी माणसाने मला एक पत्ता आणि जवळची खूण विचारली. मी पत्ता बघितला आणि दोन-तीन मिनीटे स्तब्ध झालो, कारण तो पत्ता आमच्याच सहकारी सोसायटीचा होता.

आमची सोसायटी-सहकारी सोसायटी-स्वावलंबाने उभी केलेली सोसायटी, स्वाभिमानाने जगणारी सोसायटी, अडी अडचणीला धावून येणारी सोसायटी, माझे माहेर, माझे सासर, माझे विश्व - पण त्याचे आता रूपांतर एका म्युनिसिपालिटीत झालेले होते. जास्त न थांबता मी त्या माणसाला पत्ता सांगितला. या रस्त्याने लहान मोठे खड्डे चुकवीत, सरळ शेवट पर्यंत जा. चालण्यासाठी फुटपाथ असला नसला तरी - रस्त्याचे मध्यभागामधून -गाई म्हशी, भटकी कुत्री, भिकारी, पोटासाठी धावपळ करणारे चाकरमाने, ज्ञानाजर्नासाठी पाठीवर पाटीभर पुस्तकांची दप्तरे घेतलेली लेकरे आणि जागोजागी - नगरसेवकांचे निधीमधून टाकलेल्या लोखंडी बाकांवर आयुष्याच्या अमूल्य वेळेचा अपव्यय करणारी तरूण मंडळी. मग पुढे रस्ता संपला की एक उलटी पालटी पाटी दिसेल - तीच आमची सोसायटी उद्घाटनाचे दिवशी ती सुलटी होती. त्यावर 'सुस्वागतम्' अशी अक्षरे होती पण आता उच्चाटनाची वेळ आलेली आहे यामुळे 'सुस्वा' हे गेलेले आहे. गतम् तेवढे आहे.''

काळ-काम-वेग. कोणी कोणासाठी थांबत नाही. कोणी कोणाकडे बघून हसत नाही. कोणी कोणासाठी रडत नाही - एक खिडकी योजनेमुळे जन्म आणि मृत्यु दाखला एकाच खिडकीवर मिळतो आणि खिडकी बंद असेल तर त्याचे सोयर सुतक कोणालाच नसते. अधोगतीची प्रगती सर्वांनाच मागे टाकत आहे. जुने ते सोने - भंगार भावाने पण कोणी घेत नाही. जन्मदाते वृद्धाश्रमात आणि राजाराणी वृन्दावनात. सशक्त असलेली एकत्र कुटुंब पद्धती विभक्त झाल्यामुळे अशक्त झालेली आहे. आजोबा आजी, काका-काकू, आत्या, मावशी, चुलत मावस ही रक्ताची नाती-हॅलो सी यूऽऽ, टाऽटा, हाय हाय यामध्ये मिसळली गेली आहेत का विसरली गेली आहेत देव जाणे.

पूर्वी कमावणारा एक व खाणारे दहा एकत्र कुटुंबामध्ये राहत होते. आजी चार बाय चारचे जागेत पाच बाळंतपणे झाली म्हणून मोठ्या अभिमानाने सांगत होती. पणजोबापासून पंतवंडापर्यंत तर पणजीपासून पणतीपर्यंत गोकुळ वंशावेलीवर फुलत असे, डोलत असे. नंतर जागेअभावी व व्यवसायामुळे कमावणारे दहा आणि घरात खाणारे कोणीच नाही. तेव्हा सरकार व सहकारामधून स्वाहाकार, समसहभाग, उपोषण व आत्मपरिक्षणाबरोबर शोषण आले.

आमचे सोसायटीची जन्म कथा अंगावर रोमांच उभी करणारी आहे. ते दिवस शुद्ध सोन्याचे होते. आता केवळ खाण्याचे आहेत. फक्त चार आणे फुटाने, उजाड माळावर दोन एकर पडीक जागा मिळावी, रस्ता नाही, पाणी नाही, लाईट नाही आणि स्वतंत्र घरकुलाचे स्वप्न बघणाऱ्यांचे खिशात एक फुटकी दिडकी नाही. ऑफिसकडून थोडीफार रक्कम अल्पव्याजाने मिळाली. मग किडूक मिडूक विकून सर्वांनी वास्तु उभ्या केल्या. सगळ्यांची रचना सारखी. एक हॉल, एक बेडरूम, किचन, संडास बाथरूम, डोक्यावर पाण्याची टाकी. मागे पुढे थोडीफार रिकामी जागा. रूप सारखे, रंग सारखा, समोरासमोर तोंडे. बांधकामे पुरी झाली. चिठ्या टाकून घरांचे वाटप झाले. काही पावसाळे आनंदात गेले. पण पुढे? पुढे परिस्थिती बदलत गेली. उरलेली कामे पूर्ण करण्यात बाहेर कर्जाचे डोंगर उभे केले गेले आणि व्याजांचे हप्ते फेडता फेडता बोलकी माणसे मूकबधीर झाली. प्रत्येक घरामधील मुले, मुली, अज्ञानातून सज्ञान कक्षात आली. त्यांना शिंगे फुटली, काहींना दाढी मिशा. काही कुलातील मुलांना घरजावई केले. काही परदेशगमन केलेल्या मुला-मुलींनी सहवासातूनच संसार थाटला. पंख फुटलेली पाखरे उडून गेली. पंख छाटलेली अवघड जागची दुखणी झाली.

'मातृ-छाया', 'वात्सल्य', 'माहेर' येथील सहकारी, जीवनातील सहकारी किंवा सहचारिणीचा वियोग झाल्यामुळे -वृद्धाश्रमात तर काही अनाथश्रमात विश्रांतीस गेले. संरक्षणाची

भिंत पडलेली. काही ठिकाणे. दारे खिडक्या नसलेली - गळक्या टाक्यांचे खाली कॉंग्रेस गवतात तग धरून उभी होती. सहकार संपला, स्वाहाकार उदयास आला. जागा मोकळी दिसेल तेथे सोसायटी आणि सार्वजनिक जागी सुलभ शौचालय. इकडे पाहा सोसायटी, तिकडे पाहा सोसायटी. त्यामुळे आमची सोसायटी आता म्युनिसिपालिटी झाली आहे. सोसायटीला अध्यक्ष नाही. अध्यक्ष कोणी झाला तर त्याला वेळ नाही. वेळ मिळाला तर मिटींगला कोणी येत नाही आणि आलेच तर माझे दार, माझी खिडकी, माझी भिंत, माझी गाडी या विचाराने छोटी सोसायटी पाडून त्या ठिकाणी टोलेजंग सोसायटी बांधण्याची स्वप्ने पाहात असतात. शेवटी सहकार विसरून सरकारी आदेशाप्रमाणे मी आधार कार्ड घेण्याचे गडबडीत आहे. पूर्वी बांधलेल्या ह्या घरकुलाची बांधणी दोन लाखात झाली त्याची आज किंमत दीड-दोन कोटी आहे. कोटीच्या कोटी उड्डाणे-झेपावे प्रगतीकडे. मग करा सारासार विचार आणि सोडून द्या सर्वांचा विचार नाहीतर येऽरे येऽ रे पावसा तुला देतो पैसा पैसा झाला खोटा पाऊस आला मोठ्ठा मग मोठा पाऊस आल्यावर सोसायटीत पाणी येणार मग तुम्हाला आधार कोणाचा? तेव्हा के.वाय.सी. पूर्ण करा, तसेच पुढील महिन्यात हयातीचा दाखला आठवणीने बँकेला द्या. म्हणजे ए.टी.एम. मधून पेन्शन मिळेल. मशीन प्रेम देत नाही. ते माणसाकडून मिळते पण माणसेच मशीन झाल्यामुळे विनाकारण टेन्शन घेऊ नका आणि तुम्ही आता सेवानिवृत्त आहात तेव्हा बँकेत नवीन नोटा मागू नका. नो युवर कस्टमरचा अर्थ No You are a Customer असा समजावा.

**- मधुकर दिगंबर पालकर**, पुणे

दूरध्वनी - ०२०/२४४७१७६६

## विनोद

### लाईन

हल्ली कुठेही गेले तरी लाईनीतच उभे राहावे लागते. लाईन लावण्याची शिस्त सर्वांनीच अंगी बाळगली आहे. केव्हा केव्हा ही सवय हास्यास्पद होऊ शकते.

एकदा मॅटर्निटी होममध्ये तीन होवू घातलेले बाप बाहेर येरझारा घालीत होते.

नर्स बाहेर आली तिघांपैकी एकाला म्हणाली, ''अभिनंदन तुम्हाला मुलगा झाला.''

सवयीप्रमाणे दुसरा इसम एकदम भडकला व म्हणाला, ''हा काय चावटपणा? मी ह्यांच्या आधीपासून आलेलो आहे.''

(आधारित)

**- वसंत धुपकर**, पुणे

# मला आवडलेले पुस्तक

..... **लमाण** - लेखक श्रीराम लागू...

लमाण! नाटकाचे प्रेक्षक व रंगकर्मींना निश्चित आवडेल, असे हे पुस्तक. यामध्ये ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी मराठी रंगभूमीवरील त्यांच्या नाट्यप्रवासाचा धावता आढावा घेतला आहे. नाटककाराचा माल प्रेक्षकांकडे नेऊन टाकणारे आम्ही लमाण, असे लिहिणाऱ्या डॉ. लागू यांनी त्यांचे अनुभव विश्व उलगडताना, नटाच्या अंगी कोणते गुण असणे आवश्यक आहे, याचे विवेचन केले आहे. तसेच 'नाटकाने प्रेक्षकांना काय दिले पाहिजे' हे सांगितले आहे.

नटाने आपले आयुष्य एखाद्या क्रीडा-पटूप्रमाणे प्रमाणबद्ध, लवचिक, डौलदार, चपळ आणि संपूर्णपणे स्वत:च्या ताब्यात ठेवले पाहिजे. आपली बुद्धी तत्त्वज्ञानाप्रमाणे सर्वगामी, सातत्याने मनन, चिंतन करणारी, जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करणारी, मुक्त, स्वतंत्र संचार करणारी अशी ठेवली पाहिजे.

नटाने नाटककाराचा उत्तम नाट्यवाचनाचा प्रयोग जरूर ऐकावा. प्रेक्षकांच्या अभिरूचीला शरण न जाण्याचं अवघड आव्हानही नटाने स्वीकारावे. नाटकामध्ये आपल्या भूमिकेचे स्थान लक्षात घेऊन त्याला आवश्यक तेवढाच अभिनय केला पाहिजे. नटाच्या आवाजाची प्रत याचा अंदाज घेणे, जरूरी आहे. नटाने भूमिका जगणे महत्त्वाचे नाही तर ती जगल्याचा भास निर्माण करणे हे महत्त्वाचे! भाषण नुसते पाठ होणे पुरेसे नाही तर ते जिभेवर चढले पाहिजे, असे नटसम्राट नानासाहेब फाटक म्हणत असत. गंभीर भूमिकांचा जेवढा मानसिक ताण तेवढाच विनोदी कामाचा ताण आहे. कलाकाराने आपला हस्तीदंती मनोरा बांधून त्यात बंदीवान होऊन राहता कामा नये. त्याने जास्तीत जास्त जीवनाभीमुख राहावे.

नटाने प्रेक्षकांची करमणूक केली पाहिजे व कसला तरी संदेश दिला पाहिजे. नाटकाने प्रेक्षकांना सुसंस्कृत केले पाहिजे. प्रेक्षकाने अधिक सुसंस्कृत होण्यासाठी उत्सुक झाले पाहिजे. प्रत्येक रंगकर्मीने रंगधर्मी होण्याचा ध्यास घेतला पाहिजे, हे जसे महत्त्वाचे आहे, तसेच नाटकाच्या प्रेक्षकांचे प्रबोधन करणे हेही महत्त्वाचे आहे. तरी ही जबाबदारी नाटकवाल्यांनी संघटितपणे उचलली पाहिजे. नाटक ही सांघिक कलाकृती आहे. कलेनं प्रेक्षकांचे फक्त मनोरंजन करावयाचे नसून, तिने समाजापुढे जीवनातील प्रश्न मांडून सोडवणूकीसाठी समाजाला विचार करायला उद्युक्त करायचे असते.

आत्मकथा म्हणून कोणी हे पुस्तक वाचावयास घेईल तर त्याची निराशा होईल. नाटक करताना पैसा मिळविणे हे डॉक्टरांचे ध्येय कधीच नव्हते. मनाच्या समाधानासाठी ते नाटके करीत. किंबहुना नाटक हाच डॉक्टरांचा श्वास होता. मी नाट्यरसिक म्हणून मला हे पुस्तक खूप आवडले.

**- श्री. ग. ल. देव**, पुणे, दूरध्वनी - २५४३५१६८

# पु. लं. चे सामाजिक भान

सव्यसाची, चतुरस्र, अष्टपैलु, शतावधानी अशांपैकी नेमके कोणते विशेषण लावावं असा संभ्रम पाडणारे 'महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व' म्हणजे पद्मश्री पुरूषोत्तम लक्ष्मण देशपांडे. 'शतेषु जायते शुरम्, सहस्रेषु च पंडीत:, वक्ता दशसहस्रेषु, दाता भवती वा न वा' हे सुभाषितही कमी पडावे इतके अगणित पैलू 'पुल' नावाच्या हिऱ्याला होते की त्यांच्या ईश्वरदत्त गुणांचा गुणाकार करणे केवळ अशक्य होते. पु. ल. देशपांडे म्हणजे चालते बोलते व हसते खेळते विविध गुणदर्शनच. लेखक, नट, नाटककार, गायक, वादक, संगीतकार, संगीत समीक्षक, चित्रपट व नाट्यदिग्दर्शक, वक्ता अशा अनेकविध भूमिकांमधून ते मनोरंजन, प्रबोधन व प्रभंजन सारख्याच सहजतेने करत राहिले. स्वत:ला अभिमानाने बहुरूपी किंवा खेळिया म्हणूवन घेणाऱ्या पुलंनी यातील प्रत्येक क्षेत्रातले शिवधनुष्य केवळ लीलया पेललेच नाही तर त्याचे इन्द्रधनुष्य केले. इतकेच नव्हे तर नायगारा धबधब्याभोवती चोवीस तास फुललेल्या असंख्य इन्द्रधुनष्यांच्या सप्तरंगांनी व त्यातल्या प्रत्येक रंगाच्या विविध छटांनी त्यांनी श्रोत्यांचे, प्रेक्षकांचे, रसिकांचे व चाहत्यांचे आयुष्य प्रसन्न व समृद्ध केले.

पण 'परंतु या सम हा' अशा पु.ल.नामक महान् कलावंताच्या प्रत्येक कृती व कलाकृतीला संवेदनाशील सामाजिक जाणीवेबरोबरच प्रखर राष्ट्रभक्तीचा बाज होता. 'कर्मण्ये वाधिकारस्ते, मा फलेषु कदाचन' सारखा.

त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात स्वातंत्र्यलढा सुरू होताच १९४५ साली पुलंनी राष्ट्रसेवादलासाठी शेतकऱ्यांच्या जीवनावर लोकनाट्य लिहिले. त्यापाठोपाठ पुढारी कसा असावा किंवा नसावा याचे मार्मिक विवेचन असलेला 'पुढारी पाहिजे' हा त्यांनी लिहिलेला तमाशाही खूप गाजला. पण दुधात साखरच काय पण केशर घालावे तसे 'सत्तेचे गुलाम' नाटकाच्या निमित्ताने पु.लं. व सुनीताबाईंची गाठ व लगेच लग्नगाठ पडली; त्यानंतर मात्र त्यांचे प्रत्येक 'पुढचे पाऊल' सप्तपदीसारखे हातात हात घालूनच पडत राहिले.

'वन्देमातरम्' चित्रपटातील अस्सल मराठी नायकाची 'एक पाय तुमच्या गावात दुसरा तुरुंगात किंवा स्वर्गात' ही जाज्वल्य राष्ट्रप्रेमाची भावना आयुष्यभर तशीच धगधगत राहिली. नंतर 'सबकुछ पुल' असलेल्या 'गुळाच्या गणपती'च्या निमित्ताने तर मराठी चित्रपट सृष्टीत थेट चार्ली चॅप्लीनचा सुईसारखा टोचणारा पण जोडणारा तरीही अस्वस्थ व अंतर्मुख करणारा विनोद अवतरला. ''न्यायाधीशमहाराज, मी असा काय अपराध केला होता म्हणून तुम्ही मला निरपराध म्हणून सोडून देत आहात?'' हा जेवणारवाण्याचीही ददात असलेल्या निरागस व निष्पाप नायकाचा संवाद मनात कालवाकालव करून गेला. 'तुझे आहे तुजपाशी' सारख्या सदाबहार नाटकातील 'पाप उपभोगात नाही, परिणामाची जिम्मेदारी नाकारण्यात आहे' किंवा 'न पेलणाऱ्या पट्टीत गायले की आयुष्य असेच बेसूर होते' हेही समाजातल्या सामांन्यांसाठी सहज आचरणात आणण्यासारखे महान संदेशच आहेत.

अर्थात् पुलंचे इतरही चित्रपट, नाटके, 'बटाट्याची चाळ' सारखे एकपात्री प्रयोग सर्व काही त्यांच्याच शब्दात 'सामान्यांची ही निश्वासिते, सारे जीवन इथे स्पंदते' अशी सृजनशील व सर्जनशील कलाकृतीच होती. त्याचप्रमाणे त्यांची 'व्यक्ती आणि वल्ली' किंवा 'गुण गाईन आवडी' ही व्यक्तिचित्रे. 'जावे त्यांच्या देशा', 'वंगचित्रे' सारखी प्रवासवर्णने, 'श्रोतेहो', 'रसिकहो' सारखे भाषणसंग्रह असोत प्रत्येकात सामान्य माणूस किंवा वाचकांशी थेट संवाद होता. व्यक्तिगत आयुष्यात केवळ लौकिकार्थाने नास्तिक असलेल्या पुलंची आपल्या लाखो रसिकांबद्दलची भावना मात्र 'जनमानसात जेव्हा दिसशी समोर देवा' किंवा 'भेटीलागी जीवा' अशीच होती. एवढंच कशाला 'मला नामोहरम करायचं असेल तर माझ्यासमोरची गर्दी हटवा' असं गर्दीचा बादशहा असलेले 'पुल' म्हणायचे.

'पाया पडती राजकारणी ऐसी करणी थोर, मराठीतला बिनदाढीचा तूच रवि ठाकूर' या गदिमांनी पुलंवर केलेल्या शीघ्रकवितेची गुरूदेव टागोरांच्या १५० व्या जन्मवर्षात आठवण होण्याचे कारण म्हणजे नोबेल विजेते रविन्द्रनाथ जसे सर्वार्थाने बंगाली समाजाचे झाले तसेच पुलही मराठी जनतेशी काया वाचा मने एकरूप झाले होते. तरीही 'मी पण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो' याची प्रत्यक्ष प्रचीती देणारा 'पुलं'चा एक अपवादात्मक गुण म्हणजे शब्दसंपत्तीचा कोट्याधीश आपल्या आत्यंतिक सामाजिक बांधिलकेच्या जाणीवेने दानशूरपणाच्या बाबतीतही कोट्याधीश ठरला. किंबहुना स्वत:च्या हयातीतच स्वत:च्या नावाने फाऊंडेशन स्थापन करणारे पु.लं. देशपांडे हे एकमेव मराठी साहित्यिक कलावंत असावेत. त्याच्याही पुढे जाऊन सांगायचे तर 'आधी केले पण कधी न सांगितले' अशी त्यांची औदार्यवृत्ती होती. या संदर्भातले बाळासाहेब ठाकरेंनी मार्मिकमधले चित्र खूप बोलके होते त्यावेळी अमेरिकेतून PL 480 (Public Law 480) अंतर्गत हजारो टन गहू भारताला मदत म्हणून मिळत होता. अशाच एका अमेरिकन जहाजाच्या पार्श्वभूमीवर पुलंही एक बंद थैली दान करत असल्याचे दाखविले होते व व्यंगचित्राचे शीर्षक होते. 'महाराष्ट्राचे PL 480 महाराष्ट्राच्या 'डेव्हिड लो'ने पुलं सारख्याचा केलेला केवढा मोठा गौरव परत शीतावरून केशरी भाताची परीक्षाही झाली.

'दाता भवती वा' चा सारखा पु. ल. देशपांडे नावाचा अपवाद

'पिकते तिथे विकत नाही' लाही अपवाद होता. त्यामुळेच लोकमान्य सेवा संघ, विलेपार्ले म्युझिक सर्कल तसेच इतर संलग्न संस्थांच्या जडणघडणीतही त्यांचा सक्रीय सहभाग होता. टिळक मंदिरातील 'पु. ल. देशपांडे' सभागृह त्यांच्या देणगीतून उभे राहिले तर आहेच पण त्यामध्ये 'काव्यशास्त्रविनोदात या सभागृहात श्रीमंतांचा काळ सदैव आनंदात जावो' अशा संस्कृत श्लोकाच्या त्यांनीच केलेल्या सहज सुंदर अनुवादाखाली त्यांची नेहमीप्रमाणे अस्सल मराठीतील झोकदार सहीही आहे. तिथल्याच 'पुलगौरवदर्शन' सारख्या त्यांच्या असंख्य मानसन्मानांचा, छायाचित्रांचा व आठवणींचा अनमोल ठेवा जपण्यासाठी त्यांनी देणगी दिलीच पण त्याच्या उभारणीसाठी ते स्वत: सहा महिने खपले. त्यांच्या बऱ्याच प्रकाशनाची रॉयल्टी आजही लोकमान्य सेवा संघाकडे येते. तर त्यांच्या इतर वाङ्मयाचे अधिकार त्यांनी पुण्याच्या 'आयुका'ला दिले आहेत. इतरवेळी सदैव प्रसिद्धीच्या झोतात राहिलेले पु. लं. सामाजिक कार्यात मात्र प्रसिद्धीपराङ्मुख कसे होते याचे एकच उदाहरण म्हणजे त्यांच्या आठवणींच्या संग्रहालयाला 'पु.ल.गौरव' हे नाव 'सुनीतानेच सुचविल्याने माझा नाईलाज झाला' अशी भावना त्यांनी व्यक्त केलीच.'

पुलंचे इतर सार्वजनिक कार्य म्हणजे संगीत नाटक अकादमीची स्थापना सांगलीजवळील वारणानगर बालवाद्यवृंदाला मदत व त्यांची परदेशवारी, त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या बालगंधर्वांच्या स्मारकाची संकल्पना, प्रेरणा, प्रत्यक्ष उभारणी व देखणा उद्घाटन सोहळा नरीमन पॉईंटच्या 'नॅशनल सेंटर ऑफ् परफॉर्मींग आर्टस्ची उभारणी तसेच त्याचे ८४ ते ९३ पर्यंत मानद संचालकपद, मराठवाडा साहित्य परिषद, मुंबईतील के.अी.अेम् हॉस्पिटल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचा बालविभाग, त्याच्याही पलीकडे जाऊन येरवड्याचे व्यसनमुक्ती केन्द्र, हुक्केरीचा देवदासी उत्थान प्रकल्प, मिरजचे रंगमंदीर अशा असंख्य संस्थांना हस्ते परहस्ते मदत. बॉम्बे हॉस्पिटलच्या डॉ. लीला मुळगावकर रक्तपेढीस देणगी देतानाही 'भारतातील सगळ्यात रक्तपिपासू बाई' म्हणून पुलकीत शैलीत त्यांना खास घरचा आहेर.

पण पुलंच्या समाजमनस्कतेचा सर्वोत्कृष्ट आविष्कार म्हणजे महात्मा गांधीजींच्या 'wipe out every tear from every eye' सारख्या ध्यासपूर्तीतून साकारलेले पुण्याचे 'मुक्तांगण' व्यसनमुक्ती केंद्र आणि बाबा आमट्यांच्या 'आनंदवना'तील कुष्ठरोग निर्मुलनासाठी त्यांचे अमोल सहाय्य. त्यांच्या आणखी काही अनुपमेय कामांचा घांडोळा म्हणजे चीनी आक्रमणानंतर हिमालयातील जवानांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने पाठवलेल्या कलावंतांच्या पथकात त्यांचा समावेश, आणीबाणी संपल्यावर झालेल्या निवडणुकांच्या वेळी लाखांच्या जाहीर सभा पुलंनी झंझावातासारख्या गाजवल्या पण हुकूमशाही संपून लोकशाही स्थापना होताच सैनिकाचा गणवेष उतरवून त्यांनी अगदी सहजतेने 'विदुषकाचा' वेष घातला.

अर्जुनाला श्रीकृष्णाने विश्वरूपदर्शन दिले तसे या पुरुषोत्तमानेही मराठी रसिकांना आपली विविध रूपे दाखवली तीही 'सेवा करावया लावा, देवा हा योग्य चाकर' या भावनेनेच. पु.लं. जिथे जिथे वावरले तिथे तिथे ते नावाप्रमाणे 'पुरुषोत्तम' ठरले व तेही सुसंस्कृतपणाची 'लक्ष्मणरेषा' न ओलांडता. पण या सगळ्यामागे पुरुषोत्तमाला सुनीत करणाऱ्या सुनीताबाई १२ जून १९४६ ते १२ जून २००० इतका प्रदीर्घ काळ 'सावलीपरी आज जायचे त्यांच्यामागे पाऊल गं' अशा समर्पित भावनेने सतत त्यांच्याबरोबर वावरल्या. पु. लं. व सुनीताबाई म्हणजे जणू 'दोन वाती पण एक ज्योती' असे एकमेकांना समांतर, पूरक व आदर्शवत असे अपवादात्मक सहजीवन.

'गुंतूनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा, रंगुनी रंगात सगळ्या रंग माझा वेगळा' असे कमलपत्रासारखे आयुष्य जगणाऱ्या महाराष्ट्राच्या बिरबलाचा म्हणजेच आपल्या 'पुलदैवतां'चे स्मरण करताना आपली भावना 'पुरुषोत्तमाय नम:' अशीच असणार!

**- मु. गो. सराफ**, मुंबई
मोबाईल - ९९३०७७५३७५

## अभिनंदनीय

आपले जळगाव येथील सभासद श्री. राजाराम पंडीत यांची नात कु. श्रेया पंडीत (वय वर्षे ११) हीला जळगाव येथे झालेल्या नवरात्र दांडिया स्पर्धेत तीन बक्षीसे मिळाली व लहान गटात 'दांडीया क्विन' म्हणून तिची निवड झाली. कु. श्रेया पंडीत हिचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

**- सेक्रेटरी**

## हायकू (तिनोळ्या)

१) आकाशी ग्रह, गोल, तारे
धरतीशी डोंगर, नद्या सारे
वाट बघती निरंतर, कुणाची रे!

२) पूर, भूकंप, ज्वालामुखी
भन्नाट वणवा अन् वादळ
झपाटते पंच महा भूतावळ

**- अरूण भट**, बदलापूर (पूर्व)
भ्रमणध्वनी - ९६०४३८३६०७

# हे स्वातंत्र्यवीरा !

*(स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर म्हणजे साक्षात धगधगते यज्ञकुंड. दिनांक २६ फेब्रुवारी १९६६ ला 'धन्योऽहं, धन्योऽहं प्राप्तव्यं मे न विद्यते किंचित्। धन्योऽहं, धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्यसंपन्नम्।' असं म्हणत कृतार्थ भावनेने प्रायोपवेशन करून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आत्मार्पण केलं. स्वातंत्र्यवीर देहाने आज आपल्यात नसले तरी विचाराने आणि कार्याने ते अमर झाले आहेत. कवीमनाला स्फुरलेले आणि गद्यकाव्यातून प्रगट झालेले हे तेजस्वी विचार सावरकरांच्या आत्मार्पण दिनानिमित्त प्रसिद्ध करीत आहोत. - संपादक*

भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी
स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर!
तुमचा तो कोलूचा दांडा
थोडा वेळ आम्हाला देता का?
तुमच्या अंत:करणातील
स्वातंत्र्याकांक्षेची धगधगती आग!
त्यामुळेच आम्हाला वाटतं की
पाठीवर फटके झेलताना
तुम्ही थकला नाहीत
तुमच्या ध्येयापासून तसूभरही ढळला नाहीत
पण स्वातंत्र्याची फळे चाखणारे
स्वातंत्र्याचा स्वैरपणे उपभोग घेणारे
आजचे राज्यकर्ते, नादान पुढारी
भ्रष्टाचाराची सीमा गाठून
सत्तेचा दुरुपयोग करून
स्वत:चे वजन वाढवताहेत
स्विस बँकेतील त्यांची खाती फुगताहेत
यांना तुमच्या त्या कोलूच्या दांड्याची
किंमत काय कळणार?...
आपले अखंड भारताचे स्वप्न
अखंड भारताचे विचार
आजच्या पुढाऱ्यांना काय कळणार?
आजच्या पुढाऱ्यांना त्याचं काय सोयर-सुतक ?
आपले देशभक्ती फुलविणारे विचार
आपला वैज्ञानिक दृष्टिकोन
आपण घेतलेलं 'दिव्य दाहक' सतीचं वाण
आजच्या स्वार्थांध पुढाऱ्यांना कसं पेलणार?
आपल्या पाठीवरील वळ आम्ही विसरू?
आपले धगधगते विचार आम्ही विसरू?
आपले स्फूर्तिदायी, संजीवक शब्द आम्ही विसरू?
छे! छे!! आम्हाला ते सर्व हवं आहे!
त्यासाठी तुमचा तो कोलूचा दांडा प्रथम आम्हाला द्या
आम्हाला तो आमच्या कर्तव्याची जाणीव करून देईल
आजच्या भ्रष्टाचारी पुढाऱ्यांच्या पाठी तो दांडा हाणू
उद्या त्यातूनच निर्माण होईल नवा तरुण
तो घेईल त्यापासून स्फूर्ती
तो साकारील तुमचं-आमचं अखंड भारताचं स्वप्न!
तो बनेल साऱ्या विश्वाचा आधार
आपण सर्वजण यासाठी प्रार्थना करू या
स्वातंत्र्यवीरांनी पुढील पिढ्यांवर सोपवलेलं कार्य
आपण पूर्ण करू या.
स्वातंत्र्यवीरांच्या स्मृतीस अभिवादन करू या.

- **अशोक दत्तात्रेय बुटाला,** पवई-अंधेरी (पूर्व) मुं.
भ्रमणध्वनी - ९८३३१४८९०४

## सभासदांच्या स्मरणार्थ निवेदन
## संवाद लेख स्पर्धा २०१२

वरील स्पर्धेत जास्तीत जास्त सभासद सहभागी होवून ही स्पर्धा यशस्वी करतील असा आम्हास विश्वास आहे.

**विषय -**

१) मागे वळून बघताना
(सुखी आणि समाधानी निवृत्तीनंतरचे जीवन माझे अनुभव)
किंवा
२) मी जोपासलेले छंद

स्पर्धेसाठी लेख ३१ मार्च २०१२ पर्यंतच स्वीकारले जातील. स्पर्धेचे नियम व अटी 'संवाद'च्या जानेवारी २०१२ च्या अंकात पान १२ वर पहा.

- संपादक मंडळ

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010**
**Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month**

## म्हातारपण

वयाची साठी, अंगाची काठी
कापसाची शेती, डोक्यावरती

पाय लागलेत हलायला, मान लागली डोलायला
सुरकुत्यांचे जाळे, अंगावरती

कानाची भोके, नाकावर चष्मा
डोळ्यांच्या कपारीत, थिजलेल्या ज्योती



तोंडाच्या बोळक्यात, हवेची कोठी,
त्राण नाही अंगात, तरी मिजास मोठी

– **अरूण सावरकर**, कांदिवली पूर्व, मुंबई
भ्रमणध्वनी – ९८९२८१२८३८

## स्वप्न

शेवटी आयुष्य हेच एक स्वप्न
प्रत्येक जण पाहत असतो आपआपल्या परीनं

कुणी स्वप्नातही स्वप्न पाहतो
स्वप्नातल्या या क्षणांबरोबर

आशा निराशेचे झोके घेतो
हसतो रडतो पुन्हा सर्व विसरतो....

शेवटी आयुष्य हेच एक स्वप्न
प्रत्येकजण पाहत असतो आपआपल्या परीनं.....

– **प्रकाश चित्रे**, कोल्हापूर
भ्रमणध्वनी – ९९२२६२६२००

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***

**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,
____________________

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.